सकाळ पान ४

## अवतीभवती



**बारामती :** अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या वतीने आयोजित संगीत सरगम कार्यक्रमात गीत सादर करताना हृषीकेश रानडे व मधुरा दातार.

# बारामतीकरांनी अनुभवली सूरमयी सायंकाळ

**बारामती :** 'तोच चंद्रमा नभात', 'शुक्रतारा मंदवारा', 'तरुण आहे रात्र अजूनी', 'सूर निरागस हो' अशा एकाहून एक सरस लोकप्रिय मराठी गाण्यांच्या मैफलीने बारामतीकरांची रविवारची संध्याकाळ सूरमयी झाली. कोजागरी पौर्णिमेचे औचित्य साधून अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या वतीने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आरोही प्रस्तुत ऋषीकेश रानडे व मधुरा दातार यांच्या मराठी गीतांचा संगीत सरगम हा कार्यक्रम आयोजित केला होता. बारामतीकरांनी या मैफलीस उत्स्फूर्त हजेरी लावत या गाण्यांचा आनंद लुटला. अनेक गाण्यांना वन्समोअर देत तर काही गाण्यांवर टाळ्यांचा ठेका धरत गायकांना बारामतीकरांनी प्रतिसाद दिला. दोन अडीच तासांच्या मैफलीत या दोन्ही गायकांनी लावणी, अभंग, गझल, कव्वाली अशा अनेक गाण्यांचे सादरीकरण केले. प्रास्ताविक सचिव मिलिंद वाघोलीकर यांनी केले. स्वागत संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर यांनी केले. चंद्रगुप्त वाघोलीकर, कुसुम वाघोलीकर, मिलिंद वाघोलीकर, लतिका वाघोलीकर यांच्या हस्ते गायक आणि निवेदकांचा सत्कार करण्यात आला. केतकी कुलकर्णी यांनी निवेदन केले. या वेळी बारामतीतील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

# बारामतीत रंगली कोजागरी मैफल

१/११/२३ ४

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या वतीने कोजागरी पौर्णिमेनिमित्त आयोजित कोजागिरी मैफल चांगलीच रंगली.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या जीवराज सभागृहात प्रसिद्ध गायक ऋषिकेश रानडे व मधुरा दातार यांच्या जुन्या नव्या मराठी गाण्यांचा कार्यक्रम 'वन्स मोअर'ची दाद मिळवून गेला.

स्वागत संस्थेचे सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांनी केले. संगीत सरगमचे प्रमुख अविनाश कुलकर्णी यांचा सत्कार चद्रगुप्त शाह यांच्या हस्ते, तर गायक ऋषिकेश रानडे यांचा सत्कार मिलिंद शाह यांच्या हस्ते, गायक मधुरा दातार यांचा सत्कार कुसुम शाह यांच्या हस्ते तर निवेदिका केतकी कुलकर्णी यांचा सत्कार लतिका शाह यांनी केला.

यावेळी विद्या प्रतिष्ठान संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अशोक प्रभुणे, सचिव ॲड. नीलिमा गुजर, प्रांताधिकारी वैभव नावडकर, तहसीलदार हनुमंत पाटील, माजी नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे, भारती मुथा, सुभाष ढोले, अनिल दाते, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष एम.डब्लू. जोशी, संस्थेचे खजिनदार सुनील शहा लेंगरेकर, सदस्य, चंद्रगुप्त शाह वाघोलीकर, विकास शहा लेंगरेकर, चंद्रवदन शहा मुंबईकर, डॉ. हर्षवर्धन व्होरा, डॉ. जयप्रकाश शहा वडूजकर, सत्यजित शहा पंदारकर, सौनिक शहा पंदारकर, राहुल शाह वाघोलीकर, डॉ. राजेंद्र मुथा, करण शाह इ. व समाजातील ज्येष्ठ मालती शहा मुंबइकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, माजी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर आदी यावेळी उपस्थित होते.

# टी. सी.च्या सभागृहात रंगली कोजागरीची मैफल

## बहारदार मैफलीने बारामतीकर तृप्त

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**



टी. सी. महाविद्यालयाच्या सभागृहात कोजागरीनिमित्त संगीत मैफल रंगली.

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीतर्फे कोजागरी पौर्णिमेनिमित्त तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या जीवराज सभागृहात आरोही पुणे प्रस्तुत संगीत सरगम प्रसिद्ध गायक ऋषिकेश रानडे व मधुरा दातार यांच्या जुन्या-नव्या मराठी बहारदार गाण्यांची मैफील पार पडली. बारामतीकरांनी या कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला.

संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमामध्ये युगल गीत, भक्तिगीत, गझल, कव्वाली, लावणी सादर केली. या कार्यक्रमाची सुरुवात 'कट्यार काळजात घुसली' या चित्रपटातील 'सूर निरागस हो' हे गाणे ऋषिकेश रानडे यांनी गाऊन झाली. 'तोच चंद्रमा नभात', माणिक वर्मा यांनी गायलेल्या 'हसले मनी चांदणे जपुनी टाक पाऊल साजणी नादतील पैंजणे', सुप्रसिद्ध गायक अरुण दाते यांचे 'शुक्रतारा मंद वारा', 'तरुण आहे रात्र अजुनी' तर 'रेशमाच्या रेघांनी लाल काळ्या धाग्यांनी, कर्नाटकी काशिदा मी काढीला, हात नगा लावू माझ्या साडीला' या लावणीचे दर्शन मधुरा दातार यांनी घडविले. 'विठ्ठल आवडीने प्रेम भावो', 'कानडा राजा पंढरीचा' या भक्तिगीताने सर्वांना भक्तिमय करून टाकले. 'लागा चुनरी में दाग छुपाऊ कैसे' या गाण्याने कार्यक्रमाचा समारोप झाला.

स्वागत संस्थेचे सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांनी केले. कार्यक्रमाच्या मध्यंतरानंतर संगीत 'सरगममधील कलाकारांचा सत्कार चंद्रगुप्त शाह, मिलिंद शाह, कुसुम शाह यांच्या हस्ते पार पडला. या वेळी विद्या प्रतिष्ठान संस्थेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. अशोक प्रभुणे, सचिव अ‍ॅड. नीलिमा गुजर, प्रांताधिकारी वैभव नावडकर, तहसीलदार हनुमंत पाटील, माजी नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे, माजी नगराध्यक्षा भारती मुथा, सुभाष ढोले, अनिल दाते, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष एम. डब्ल्यू. जोशी आदींची उपस्थिती होती.

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार सुनील शहा लेंगरेकर, सदस्य, चंद्रगुप्त शाह वाघोलीकर, विकास शहा लेंगरेकर, चंद्रवदन शहा मुंबईकर, डॉ. हर्षवर्धन व्होरा, डॉ. जयप्रकाश शहा वडुजकर, सत्यजित शहा पंदारकर, सोनिक शहा पंदारकर, राहुल शाह वाघोलीकर, डॉ. राजेंद्र मुथा, करण शाह, मालती शहा मुंबईकर हेही उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, माजी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांचीही उपस्थिती होती.

# रामतीकर तृप्त

मती : पुढारी वृत्तसेवा

येथील अनेकान्त एज्युकेशन युटीतर्फे कोजागरी पौर्णिमेनिमित्त ाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या राज सभागृहात आरोही पुणे प्रस्तुत त सरगम प्रसिद्ध गायक ऋषिकेश ई व मधुरा दातार यांच्या जुन्या- मराठी बहारदार गाण्यांची मैफील पडली. बारामतीकरांनी या क्रमाचा मनमुराद आनंद लुटला.

संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह लीकर यांच्या संकल्पनेतून व र्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित होता. या कार्यक्रमामध्ये युगल भक्तिगीत, गझल, कव्वाली, णी सादर केली. या कार्यक्रमाची त 'कट्यार काळजात घुसली' या टातील 'सूर निरागस हो' हे गाणे श रानडे यांनी गाऊन झाली. 'तोच



टी. सी. महाविद्यालयाच्या सभागृहात कोजागरीनिमित्त संगीत मैफल रंगली.

टाक पाऊल साजणी नादतील पैंजणे', सुप्रसिद्ध गायक अरुण दाते यांचे 'शुक्रतारा मंद वारा', 'तरुण आहे रात्र अजुनी' तर 'रेशमाच्या रेघांनी लाल काळ्या धाग्यांनी, कर्नाटकी काशिदा मी काढीला, हात नगा लावू माझ्या साडीला' या लावणीचे दर्शन मधुरा दातार यांनी घडविले. 'विठ्ठल आवडीने प्रेम भावो', 'कानडा राजा पंढरीचा' या भक्तिगीताने सर्वांना भक्तिमय करून टाकले. 'लागा चुनरी में दाग छुपाऊ

स्वागत संस्थेचे सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांनी केले. कार्यक्रमाच्या मध्यंतरानंतर संगीत 'सरगममधील कलाकारांचा सत्कार चंद्रगुप्त शाह, मिलिंद शाह, कुसुम शाह यांच्या हस्ते पार पडला. या वेळी विद्या प्रतिष्ठान संस्थेचे उपाध्यक्ष अॅड. अशोक प्रभुणे, सचिव अॅड. नीलिमा गुजर, प्रांताधिकारी वैभव नावडकर, तहसीलदार हनुमंत पाटील, माजी नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे, माजी नगराध्यक्षा भारती मुथा,

आदींची उपस्थिती होती.

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार सुनील शहा लेंगरेकर, सदस्य, चंद्रगुप्त शाह वाघोलीकर, विकास शहा लेंगरेकर, चंद्रवदन शहा मुंबईकर, डॉ. हर्षवर्धन व्होरा, डॉ. जयप्रकाश शहा वडुजकर, सत्यजित शहा पंदारकर, सोनिक शहा पंदारकर, राहुल शाह वाघोलीकर, डॉ. राजेंद्र मुथा, करण शाह, मालती शहा मुंबईकर हेही उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. अविनाश जगताप,

पुढारी ३/११/२३ पान ३

# टी. सी. महाविद्यालयात आविष्कार स्पर्धा उत्साहात

३/११/२३ ३

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात विभागीय आंतर महाविद्यालयीन संशोधन प्रकल्प आविष्कार २०२३ ही स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली.

प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. या स्पर्धेत विभागीय स्तरावरील विविध महाविद्यालयातून एकूण १५४ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांनी ९३ पोस्टर सादर केले. प्रमुख पाहुणे म्हणून पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. देवीदास वायदंडे होते. प्रा. डॉ. वायदंडे म्हणाले, संशोधन हे सकारात्मक आणि माणसाला जीवनदान देणारे असावे. संशोधक हे देशाला तारणारे घटक असतात.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये खूप कौशल्ये आहेत. त्यांची संशोधक वृत्ती जोपासली पाहिजे. परीक्षक म्हणून प्रा. ज्योतीराम माळी, प्रा. एच. ए. पवार, प्रा. डॉ. पल्लवी देवकाते, प्रा. पी. डी. इंगळे, प्रा. माणिक बुचडे, प्रा. डॉ. दर्शन शहा, प्रा. डॉ. संतोष जाधव, प्रा. प्रवीण सरवदे यांनी काम पाहिले.

संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह-वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह-वाघोलीकर यांनी स्पर्धेतील सहभागींना शुभेच्छा दिल्या. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन डॉ. विवेक बळे व डॉ. सुशील देशमुख यांनी केले. तर डॉ. रामचंद्र सपकाळ यांनी आभार मानले.

पुढारी ३/११/२३ पान ३

# सीबीएसई राष्ट्रीय हॉकीत अनेकान्तचा झेंडा

**पुढारी ANCHOR**

३/११/२३ २

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दक्षिण विभागात झालेल्या हॉकी स्पर्धेत बारामतीच्या अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुलींच्या हॉकी संघाने अद्भुत, धमाकेदार कामगिरी करीत अनेकान्तच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. संघाने दक्षिण आंतर विभागीय स्पर्धेत प्रथमच सहभाग नोंदवत सुवर्णपदक पटकावले आहे. विजयी संघांचे अतिशय जल्लोषात स्वागत करण्यात आले.

ही स्पर्धा बागलकोट (कर्नाटक) येथे झाली. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा व केरळ या राज्यांतील उत्कृष्ट असे संघ सहभागी झाले होते. स्पर्धा प्रथम साखळी पद्धतीने खेळवली गेली. यामध्ये पहिल्या सामन्यात अनेकान्त स्कूलने रॅन इंटरनॅशनल स्कूल, मुंबई या संघाचा १-० शून्य असा पराभव करीत स्पर्धेची विजयी सुरुवात केली. दुसरा सामना स्पर्धा आयोजक बसवेश्वर इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, बागलकोट या संघाशी झाला. यामध्ये अनेकान्त स्कूलने ६-१ असा एकतर्फी विजय मिळवला. साखळी स्पर्धेचा अंतिम सामना शिवशंकराप्पा इंग्लिश मीडियम स्कूल, दावणगिरी (कर्नाटक) यांच्यासोबत झाला. त्यामध्ये स्कूलने ३-० असा विजय मिळवला व साखळी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. यानंतर उपान्त्य फेरीत ड्रीम वर्ल्ड स्कूल, बल्लारी या संघाचा पराभव करीत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामना कोडगू विद्यालय, कोडगू (कर्नाटक) यांच्याशी अतिशय चुरशीचा झाला. यामध्ये स्कूलने कोडगू संघाचा १-० असा पराभव करीत प्रथमच सुवर्णपदक प्राप्त केले.



राष्ट्रीय हॉकी स्पर्धेत विजेतेपद मिळविणाऱ्या अनेकान्तच्या संघासह प्राचार्या व मार्गदर्शक.

स्पर्धेत उत्कृष्ट गोलरक्षक म्हणून स्कूलच्या तनुश्री पोटे या खेळाडूला सन्मानित करण्यात आले. विजयी अनेकान्त स्कूलची केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्डाच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा भोपाळ (मध्य प्रदेश) या ठिकाणी डिसेंबर महिन्यात खेळवली जाणार आहे. विजयी संघात चैतन्या खोरे (कर्णधार), आर्या भुजबळ, तनुश्री राऊत, तनुश्री पोटे, कावेरी जाधव, सृष्टी रुपनवर, सृष्टी भोसले, समृद्धी हाताळे, अवंतिका म्हेत्रे, पूर्वा जाधव, भूमिका जाधव, कृतिका गांधी, जुई गुळुमकर, खुशबू कुमावत, गार्गी गोडसे, आदिती परकाळे, वैभवी माने, शर्वरी धर्माधिकारी या खेळाडूंचा समावेश होता. शाळा प्रशासन, शालेय व्यवस्थापन समिती तसेच सर्व पालक वर्ग यांनी विजेत्या स्पर्धकांचे व क्रीडा शिक्षक यांचे विशेष अभिनंदन केले.

पुढारी 3/11/23 पान 3

# टी. सी. महाविद्यालयात आविष्कार स्पर्धा उत्साहात

3/11/23 3

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात विभागीय आंतर महाविद्यालयीन संशोधन प्रकल्प आविष्कार २०२३ ही स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली.

प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. या स्पर्धेत विभागीय स्तरावरील विविध महाविद्यालयातून एकूण १५४ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांनी ९३ पोस्टर सादर केले. प्रमुख पाहुणे म्हणून पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. देवीदास वायटंडे होते. प्रा. डॉ. वायटंदे म्हणाले, संशोधन हे सकारात्मक आणि माणसाला जीवनदान देणारे असावे. संशोधक हे देशाला तारणारे घटक असतात.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये खूप कौशल्ये आहेत. त्यांची संशोधक वृत्ती जोपासली पाहिजे. परीक्षक म्हणून प्रा. ज्योतीराम माळी, प्रा. एच. ए. पवार, प्रा. डॉ. पल्लवी देवकाते, प्रा. पी. डी. इंगळे, प्रा. माणिक बुचडे, प्रा. डॉ. दर्शन शहा, प्रा. डॉ. संतोष जाधव, प्रा. प्रवीण सरवदे यांनी काम पाहिले.

संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह-वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह-वाघोलीकर यांनी स्पर्धेतील सहभागींना शुभेच्छा दिल्या. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन डॉ. विवेक बळे व डॉ. सुशील देशमुख यांनी केले. तर डॉ. रामचंद्र सपकाळ यांनी आभार मानले.

पुढारी 3/11/23 पान 3

# सीबीएसई राष्ट्रीय हॉकीत अनेकान्तचा झेंडा

**पुढारी ANCHOR**

3/11/23 2

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दक्षिण विभागात झालेल्या हॉकी स्पर्धेत बारामतीच्या अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुलींच्या हॉकी संघाने अद्भुत, धमाकेदार कामगिरी करीत अनेकान्तच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. संघाने दक्षिण आंतर विभागीय स्पर्धेत प्रथमच सहभाग नोंदवत सुवर्णपदक पटकावले आहे. विजयी संघांचे अतिशय जल्लोषात स्वागत करण्यात आले.

ही स्पर्धा बागलकोट (कर्नाटक) येथे झाली. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा व केरळ या राज्यांतील उत्कृष्ट असे संघ सहभागी झाले होते. स्पर्धा प्रथम साखळी पद्धतीने खेळवली गेली. यामध्ये पहिल्या सामन्यात अनेकान्त स्कूलने रॅन इंटरनॅशनल स्कूल, मुंबई या संघाचा १-० शून्य असा पराभव करीत स्पर्धेची विजयी सुरुवात केली. दुसरा सामना स्पर्धा आयोजक बसवेश्वर इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, बागलकोट या संघाशी झाला. यामध्ये अनेकान्त स्कूलने ६-१ असा एकतर्फी विजय मिळवला. साखळी स्पर्धेचा अंतिम सामना शिवशंकराप्पा इंग्लिश मीडियम स्कूल, दावणगिरी (कर्नाटक) यांच्यासोबत झाला. त्यामध्ये स्कूलने ३-० असा विजय मिळवला व साखळी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. यानंतर उपान्त्य फेरीत ड्रीम वर्ल्ड स्कूल, बल्लारी या संघाचा पराभव करीत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामना



राष्ट्रीय हॉकी स्पर्धेत विजेतेपद मिळविणाऱ्या अनेकान्तच्या संघासह प्राचार्या व मार्गदर्शक.

कोडगू विद्यालय, कोडगू (कर्नाटक) यांच्याशी अतिशय चुरशीचा झाला. यामध्ये स्कूलने कोडगू संघाचा १-० असा पराभव करीत प्रथमच सुवर्णपदक प्राप्त केले.

स्पर्धेत उत्कृष्ट गोलरक्षक म्हणून स्कूलच्या तनुश्री पोटे या खेळाडूला सन्मानित करण्यात आले. विजयी अनेकान्त स्कूलची केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्डाच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा भोपाळ (मध्य प्रदेश) या ठिकाणी डिसेंबर महिन्यात खेळवली जाणार आहे. विजयी संघात चैतन्या खोरे (कर्णधार), आर्या भुजबळ, तनुश्री राऊत, तनुश्री पोटे, कावेरी जाधव, सृष्टी रुपनवर, सृष्टी भोसले, समृद्धी हाताळे, अवंतिका म्हेत्रे, पूर्वा जाधव, भूमिका जाधव, कृतिका गांधी, जुई गुळुमकर, खुशबू कुमावत, गार्गी गोडसे, आदिती परकाळे, वैभवी माने, शर्वरी धर्माधिकारी या खेळाडूंचा समावेश होता. शाळा प्रशासन, शालेय व्यवस्थापन समिती तसेच सर्व पालक वर्ग यांनी विजेत्या स्पर्धकांचे व क्रीडा शिक्षक यांचे विशेष अभिनंदन केले.

करण्यात आले होते. यावेळी उपनगराध्यक्ष नवनाथ बलाळ, | सोसायटीचे, तुळजाराम चतुरचंद ... २ (ग) व २ तसेच महाराष्ट्र (नागरी

# बारामतीच्या अनेकांत स्कूलला सुवर्णपदक



बारामती : अनेकांत इंग्लिश मीडियम स्कूलच्या सुवर्णपदक प्राप्त संघाचा सन्मान करताना प्राचार्या रिचा तिवारी.

**बारामती, ता. ३ :** येथील अनेकांत इंग्लिश मीडियम स्कूलमधील मुलींच्या संघाने कर्नाटकातील बागलकोट येथे झालेल्या दक्षिण आंतर विभागीय हॉकी स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळांतर्गत साऊथ झोन हॉकी स्पर्धेत प्रथमच सहभाग नोंदवत थेट सुवर्णपदकाची कमाई केली. या स्पर्धेत महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, केरळ या राज्यांतील विविध संघ सहभागी झाले होते.

या स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात अनेकांत स्कूलने मुंबईच्या रॅन इंटरनॅशनल स्कूलचा पराभव केला, त्यानंतर बागलकोटच्या बसवेश्वर इंटरनॅशनल पब्लिक स्कूल वर ६-१ असा विजय मिळविला. तसेच, कर्नाटकच्या दावणगिरीमधील शिवशंकराप्पा इंग्लिश मिडियम स्कूलचा पराभव करत या संघाने साखळी स्पर्धेत विजय मिळविला व उपांत्य फेरीत प्रवेश केला.

या संघाने उपांत्य फेरीतील बल्लारीच्या ड्रीम वर्ल्ड स्कूल संघाचा पराभव करीत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात संघाने कर्नाटकातील कोडगू विद्यालयावर १-० ने मात करीत प्रथमच सुवर्णपदकाला गवसणी घातली. तसेच, भोपाळ येथे डिसेंबर महिन्यात केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्डाच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्रता मिळविली. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर व प्राचार्या रिचा तिवारी यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले. **विजयी संघ :** चैतन्या खोरे (कर्णधार), आर्या भुजबळ, तनुश्री राऊत, तनुश्री पोटे (गोलरक्षक), कावेरी जाधव, सृष्टी रूपनवर, सृष्टी भोसले, समृद्धी हाताळे, अवंतिका म्हेत्रे, पूर्वा जाधव, भूमिका जाधव, कृतिका गांधी, जुई गुल्मकर, खुशबू कुमावत, गार्गी गोडसे, आदिती परकाळे, वैभवी माने व शर्वरी धर्माधिकारी.



बारामती : विद्यार्थ्यांना पारितोषिक प्रदान करताना मान्यवर.

## बारामती येथे भित्तीपत्र स्पर्धेचे आयोजन

**बारामती, ता. ३ :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात विभागीय आंतरमहाविद्यालयीन संशोधन प्रकल्प आविष्कार २०२३ स्पर्धेचे आयोजन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व टीसी महाविद्यालयाच्या वतीने केले होते. स्पर्धेत १५४ विद्यार्थ्यांनी ९३ भित्तीपत्र (पोस्टर) सादर केले.

या वेळी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य देविदास वायदंडे, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, रजिस्ट्रार अभिनंदन शहा उपस्थित होते. अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शहा -वाघोलीकर, सचिव मिलिंद शहा -वाघोलीकर या सदस्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. परीक्षक म्हणून ज्योतिराम माळी, एच. ए. पवार, डॉ. पल्लवी देवकाते, पी. डी. इंगळे, माणिक बुचडे, डॉ. दर्शन शहा, डॉ. संतोष जाधव, प्रवीण सरवदे यांनी नियोजन केले, उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन डॉ. विवेक बळे, डॉ. सुशील देशमुख यांनी तर डॉ. रामचंद्र सपकाळ यांनी आभार मानले.

# बारामतीकरांनी अनुभवली सूरमयी संध्याकाळ

**बारामती, ता. ३ :** ‘अयोध्येचा राजा’ ते ‘सामना...’, ‘अशी ही बनवाबनवी’ ते ‘जोगवा’ आणि ‘नटरंग’पासून ते ‘सैराट’ या चित्रपटापर्यंत जुन्या नवीन चित्रपटांचा प्रवास आणि गीत गायनाचा बारामतीकरांनी गुरुवारी (ता. २) सुखद अनुभव घेतला.

तनिष्कच्या बारामती शोरूमच्या वतीने दिवाळीचे औचित्य साधून प्रभात ते सैराट हा राहुल सोलापूरकर यांचा संगीतमय कार्यक्रम आयोजित केला होता. राहुल सोलापूरकर यांनी मराठी चित्रपटांची सुरवातीपासूनची वाटचाल रंजक पद्धतीने वैविध्यपूर्ण माहिती देत रसिकांपुढे सादर केली.



बारामती : कलाकारांसमवेत चेतन वाल्हेकर, मिलिंद वाघोलीकर, सारिका वाघोलीकर, मंजूषा वाघोलीकर, राहुल सोलापूरकर आणि इतर मान्यवर.

संत तुकाराम, कुंकू, माणूस या चित्रपटातील गीतांचे सादरीकरण प्रभात कंपनीची वाटचाल उलगडली. कौटुंबिक चित्रपटानंतर तमाशाप्रधान चित्रपटांची आलेली लाट, त्या नंतर धुमधडाका, थरथराट, अशी ही बनवाबनवी अशा अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन पिळगावकर, महेश कोठारे यांचे करमणूकप्रधान चित्रपट, त्यानंतर अग बाई अरेच्या, जोगवा, नटरंग, बालगंधर्व, कट्यार काळजात घुसली अशा अलीकडील काळातील विविध विषय घेत साकारलेले चित्रपट, त्यातील नृत्य, गीते व संवाद यांच्या सादरीकरणाने बारामतीकर भारावून गेले.

मिलिंद ओक यांची निर्मिती, राहुल सोलापूरकर, जितेंद्र अभ्यंकर, चैतन्य कुलकर्णी, मृण्मयी तिरोडकर, योगिता दामले, मोहिका दामले यांच्यासह अनेक कलाकारांनी आपली कलासादर केली. उत्तम दिग्दर्शन, कलात्मक नेपथ्य, सुंदर वेशभूषा यांचा सुंदर मिलाफ या कार्यक्रमाच्या निमित्ताने बारामतीकरांना अनुभवता आला.

तनिष्क बारामतीचे चेतन शहा (वाल्हेकर), सारिका शहा, अपर्णा शहा, कुसुम शहा, निमिष व मानस शहा यांनी स्वागत केले. पौर्णिमा तावरे, मधुबाला भोसले, अॅड. ए. व्ही. प्रभुणे, किरण गुजर, किशोर शहा (सराफ), मनोज पोतेकर, धनंजय जामदार, किशोर मेहता यांनी दीपप्रज्वलन करून प्रारंभ केला. मिलिंद वाघोलीकर यांनी आभार मानले.

या प्रसंगी तनिष्कचे एरिया बिझनेस मॅनेजर चंदन गुप्ता यांनी तनिष्क आणि टाटा ब्रँडबाबत माहिती दिली. ज्वेलरी डिझाइनर आयनतिना यांनी तनिष्कच्या घरोवर या नवीन कलेक्शनबाबत माहिती दिली.

दै: पुढारी



# अविष्कार स्पर्धेचा मान बारामतीच्या टी. सी. महाविद्यालयाला

## पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात

बारामती : पुढारी वृत्तसेवा

विद्यार्थी, संशोधक, संशोधन संस्था आणि शैक्षणिक संस्था यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनातून संवाद राहावा, यासाठी २००६ साली महाराष्ट्र शासनाने विभागीय आंतरमहाविद्यालयीन संशोधन प्रकल्प अविष्कार २०२३ या नावाने स्पर्धा सुरू केली आहे. यंदा या स्पर्धेचा हा मान बारामतीच्या टी. सी. महाविद्यालयाला मिळाला. स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कार वितरण सोहळा महाविद्यालयाच्या जीवराज सभागृहात पार पडला, अशी माहिती प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी दिली.



अविष्कार स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना गौरविताना मान्यवर.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :

**अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदवी :** प्रथम- मैथिली जगताप आणि प्रांजल नाळे, द्वितीय- सोहम वैद्य आणि शिवांजली निंबाळकर (विद्या प्रतिष्ठान बारामती), तृतीय अनिकेत काळे आणि अभिषेक धुमाळ (शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगाव).

**पदव्युत्तर :** अक्षदा जगदाळे (शारदाबाई पवार महाविद्यालय माळेगाव), द्वितीय- अल्फिया शेख (एसएससी कॉलेज, जुन्नर), तृतीय- श्रुती गिरमकर (माळेगाव).

**शेती आणि पशुपालन पदवी :** प्रथम- अभिषेक राऊत आणि ओम मोहिते (विद्या प्रतिष्ठान, बारामती), द्वितीय- सुमेध इंगोले आणि प्रज्वल बोराडे (एच. आर. कॉलेज, राजगुरुनगर), तृतीय- पार्थ निंबाळकर आणि शिवतेज भिजवे (शिवनगर, माळेगाव).

**पदव्युत्तर :** प्रथम- वैष्णवी जोशी (माळेगाव), द्वितीय- सिद्धांत गायकवाड (जुन्नर), तृतीय- प्रियांका गायकवाड (सी. टी. बोरा, शिरूर)

**डॉक्टरेट पदवी :** प्रथम- सोनाली निकम (माळेगाव).

**फार्मसी आणि वैद्यकीय पदवी :** प्रथम- गायत्री काकडे आणि सानिका काकडे (सीताबाई थिटे कॉलेज, शिरूर), द्वितीय- चैताली कोतवाल (माळेगाव), तृतीय- दिशा वाघचौरे आणि सृष्टी क्षीरसागर (सी. टी. बोरा कॉलेज, शिरूर).

**पदव्युत्तर :** प्रथम- अमिना पठाण (छत्रपती शिवाजी कॉलेज, जुन्नर), द्वितीय- प्रीती कदम, तृतीय : ऋतुजा सावळे (शारदाबाई पवार महाविद्यालय, माळेगाव).

# 'सेल्फी विथ मेरी माटी'साठी अनेकान्तचा गौरव

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

'मेरी माटी मेरा देश' उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने 'सेल्फी विथ मेरी माटी' या मोहिमेने गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे. या उपक्रमासाठी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाने केलेल्या कार्याची दखल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेत संस्थेचा गौरव केला.

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत अनेकान्त एज्युकेशन सोसायटीला सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम पुण्यात शिवाजीनगर येथील मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सभागृहात पार पडला.

संस्थेच्या वतीने महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे व राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. विलास कर्डीले यांनी सन्मान स्वीकारला. या कार्यक्रमात डॉ. कर्डीले यांचादेखील सन्मान करण्यात आला. 'मेरी माटी मेरा देश' या उपक्रमातील सहभागींचे संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह-वाघोलीकर व सचिव मिलिंद शाह-वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी अभिनंदन केले.



**'मेरी माटी मेरा देश' उपक्रमांतर्गत अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचा गौरव करण्यात आला.**

---

**पुणे जिल्हा** पुणे, शुक्रवार, १ डिसेंबर २०२३

**→ अवतीभवती**



**पुणे :** चंद्रकांत पाटील व चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते सन्मान स्वीकारताना डॉ. अशोक काळंगे व डॉ. विलास कर्डिले.

## बारामतीच्या टीसी महाविद्यालयाचा सन्मान

**बारामती :** 'मेरी माटी मेरा देश' उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सेल्फी विथ मेरी माटी या मोहिमेने गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये स्थान प्राप्त केले आहे. या उपक्रमासाठी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाने केलेल्या कार्याची दखल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतली. या उपक्रमात समाजातील विविध घटकांतील सहभागी व्यक्ती व संस्थाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये त्यांना गौरविण्यात आले. महाविद्यालयाच्यावतीने उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे व डॉ. विलास कर्डिले यांनी सन्मान स्वीकारला. राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा को-ऑर्डिनेटर डॉ. विलास कर्डिले यांचा देखील विशेष सन्मान केला. 'मेरी माटी मेरा देश' या उपक्रमातील उत्स्फूर्त सहभागींचे संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर व सचिव मिलिंद वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी अभिनंदन केले.

दै. लोकमत दि १/१२/२०२३ पान



'मेरी माटी मेरा देश' उपक्रमांतर्गत अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचा गौरव करण्यात आला.

# 'सेल्फी विथ मेरी माटी' मोहिमेसाठी अनेकान्त शिक्षण संस्थेचा केला गौरव

१/१२/२३ पान ८

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : 'मेरी माटी मेरा देश' उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने 'सेल्फी विथ मेरी माटी' या मोहिमेने गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे.

या उपक्रमासाठी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामतीच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाने केलेल्या कार्याची दखल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेत अनेकान्त शिक्षण संस्थेचा गौरव केला.

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत अनेकान्त एज्युकेशन सोसायटीला सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम पुण्यात शिवाजीनगर येथील मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सभागृहात पार पडला. संस्थेच्या वतीने महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे व डॉ. विलास कर्डिले यांनी सन्मान स्वीकारला.

या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. विलास कर्डिले यांचादेखील सन्मान करण्यात आला. 'मेरी माटी मेरा देश' या उपक्रमातील उत्स्फूर्त सहभागींचे संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह-वाघोलीकर व सचिव मिलिंद शाह-वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी कौतुक केले.



दै. सकाळ पान ५

## अवतीभवती



पुणे : चंद्रकांत पाटील व चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते सन्मान स्वीकारताना डॉ. अशोक काळंगे व डॉ. विलास कर्डिले.

### बारामतीच्या टीसी महाविद्यालयाचा सन्मान

बारामती : 'मेरी माटी मेरा देश' उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सेल्फी विथ मेरी माटी या मोहिमेने गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये स्थान प्राप्त केले आहे. या उपक्रमासाठी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाने केलेल्या कार्याची दखल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतली. या उपक्रमात समाजातील विविध घटकांतील सहभागी व्यक्ती व संस्थाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये त्यांना गौरविण्यात आले. महाविद्यालयाच्यावतीने उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे व डॉ. विलास कर्डिले यांनी सन्मान स्वीकारला. राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा को-ऑर्डिनेटर डॉ. विलास कर्डिले यांचा देखील विशेष सन्मान केला. 'मेरी माटी मेरा देश' या उपक्रमातील उत्स्फूर्त सहभागींचे संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर व सचिव मिलिंद वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी अभिनंदन केले.

दि ०७/१२/२३ पान ६

## संशोधन प्रकल्प स्पर्धा : जुन्नरच्या छत्रपती महाविद्यालयाच्या तीनही प्रकल्पांची निवड

# ‘आविष्कार २०२३’ मध्ये विद्यार्थ्यांना यश

**जुन्नर, ता. ६ : येथील श्री शिवछत्रपती महाविद्यालयाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ‘आविष्कार २०२३’ या विभागीय पातळीवरील संशोधन प्रकल्प स्पर्धेत तीन प्रकल्प सादर केले. या तीनही प्रकल्पांची स्पर्धेच्या पुढील फेरीसाठी निवड झाली असल्याचे प्राचार्य डॉ. एम. बी. वाघमारे यांनी सांगितले.**

बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात ही स्पर्धा नुकतीच पार पडली. यामध्ये तीन वेगवेगळ्या श्रेणीत शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या पदव्युत्तर प्राणिशास्त्र विभाग व संशोधन केंद्राचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

या स्पर्धेतील पहिल्या वैद्यकीय व औषधनिर्माण श्रेणीमध्ये अमिना पठाण व मासूमा सय्यद यांनी सादर केलेल्या ‘स्क्रीनिंग ऑफ अँटिमायक्रोबियल अ‍ॅक्टिव्हिटी अँडफायटोकेमिकल स्टडीज ऑफ अ मशरूम ऍगारिकस सिल्व्हॅटिकस’ प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला. या प्रकल्पामध्ये प्रतिजैविक प्रतिरोधकतेच्या जागतिक समस्येवर एक आश्वासक उपाय म्हणून ऍगारिकस सिल्व्हॅटिकस या मशरूमचा उपयोग केला जाऊ शकतो हे दाखविण्यात आले. त्यानंतर अभियांत्रिकी व तंत्रज्ञान श्रेणीमध्ये अल्फियाबानो शेख आणि जैनब फातिमा कागदी यांनी सादर केलेल्या ‘रिमूव्हल ऑफ मिथील ग्रीन डाय बाय युजिंग नॉविल बायोमटेरिअल’ प्रकल्पाला द्वितीय क्रमांक मिळाला. यात टेक्सटाइल कारखान्यातील दूषित पाण्याच्या शुद्धीकरणासाठी आपण अर्चटिना फुलिका या गोगलगाइच्या शंखाचा वापर करू शकतो हे सिद्ध करण्यात आले. तसेच, कृषी व पशुपालन श्रेणीमध्ये सिद्धांत गायकवाड व सर्फराज पठाण यांनी सादर केलेल्या ‘इफेक्ट्स ऑफ सिंथेटिक पेन किलर्स ऑन फ्रेशवॉटर फौना : अ केस स्टडी ऑन पोइसिलीया रेटीक्यूलॅटा’ या संशोधन प्रकल्पाला देखील द्वितीय क्रमांक मिळाला. या प्रकल्पामध्ये आपण जे कृत्रिम वेदनाशामक औषधी घेतो त्याचा माशांच्या रक्तातील पेशींवर काय दुष्परिणाम होतो हे दाखविण्यात आले आहे.

या तीनही प्रकल्पांना महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभाग व संशोधन केंद्रप्रमुखांचे मार्गदर्शन लाभले. या यशासाठी संस्थेचे अ‍ॅड. संजय काळे, अध्यक्ष प्रतिनिधी व्ही. बी. कुलकर्णी व सर्व शिक्षकांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



बारामती : ‘आविष्कार २०२३’ स्पर्धेचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार स्वीकारताना श्री शिवछत्रपती महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी.

सा. रणांगण दि. ०५/१२/२३

# तु.च. महाविद्यालयाचे लेफ्टनंट डॉ. विवेक बळे नर्मदा ट्रेकिंग शिबिरात गौरवांकीत




बारामती-तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रमुख लेफ्टनंट डॉ. विवेक बळे यांना २० नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २३ या कालावधीत एनसीसी ग्रुप मुख्यालय वडोदरा अंतर्गत राजपिपला येथे आयोजित सरदार पटेल नर्मदा ट्रेकिंग शिबिरात उत्कृष्ट कामगिरी आणि समर्पणासाठी त्यांना कौतुक पत्र प्रदान करण्यात आले. त्यांनी आपल्या कर्तव्याच्या पलिकडे जाऊन उच्च व्यवसायिक क्षमता, उत्साह आणि कार्य प्रदर्शित केल्याबद्दल ५ गुजरात बटालियन एनसीसी सुरतचे उपकमान अधिकारी तसेच शिबीराचे प्रशासकीय अधिकारी कर्नल गौतम राय यांच्याकडून हे कौतुक पत्र प्रदान करण्यात आले. या कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांना सुंदरपुरा कर्जन डॅम, जुना राज इत्यादी विविध ठिकाणी ट्रेकिंग केले. लेफ्टनंट डॉ. विवेक बळे यांची दोन महाराष्ट्र बटालियन एनसीसी पुणे यांचे मार्फत या शिबिरासाठी निवड झाली. आणि त्यांनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत शिबिराचे ठिकाणी झालेल्या विविध स्पर्धांमध्ये हिरीरीने सहभाग घेऊन महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. सदर शिबिरामध्ये महाराष्ट्रातून एकूण १०२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यातील ५१ विद्यार्थी पुणे ग्रुप येथील असून ५१ विद्यार्थी मुंबई बी-ग्रुप येथून होते. या शिबिरासाठी एकूण ५ विविध राज्यामधून विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये प्रामुख्याने गुजरात, दिल्ली, मध्य प्रदेश, छत्तीस गढ, महाराष्ट्र आणि उत्तराखंड इत्यादी संचालनालयानी सहभाग घेतला होता. त्यांच्या या कार्याबद्दल महाराष्ट्र संचालनालयास स्मृतीचिन्ह व लेफ्टनंट विवेक बळे यांना कौतुक प्रदानपत्र प्रदान करण्यात आले.

chand College




टी. सी. महाविद्यालयातील लेफ्टनंट डॉ. विवेक बळे यांना सन्मानित करण्यात आले.

# लेफ्टनंट डॉ. बळे यांचा गौरव

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रमुख लेफ्टनंट डॉ. विवेक बळे यांनी २० ते २७ नोव्हेंबर या कालावधीत एनसीसी ग्रुप मुख्यालय वडोदरा अंतर्गत राजपिपला येथे आयोजित सरदार पटेल नर्मदा ट्रेकिंग शिबिरात केलेली उत्कृष्ट कामगिरी आणि समर्पणासाठी प्रमाणपत्रासह गौरविण्यात आले.

डॉ. बळे यांनी आपल्या कर्तव्याच्या पलीकडे जाऊन उच्च व्यावसायिक क्षमता, उत्साह आणि कार्य केल्याबद्दल ५ गुजरात बटालियन एन.सी.सी. सुरतचे उपकमान अधिकारी तसेच शिबिराचे प्रशासकीय अधिकारी कर्नल गौतम रॉय यांच्याकडून हे सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना सुंदरपुरा, करजन डॅम, जुनाराज इत्यादी विविध ठिकाणी ट्रेकिंग केले. लेफ्टनंट डॉ. विवेक बळे यांची २ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, पुणे यांच्यामार्फत या शिबिरासाठी निवड झाली आणि त्यांनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत शिबिराच्या ठिकाणी झालेल्या विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.


या शिबिरामध्ये महाराष्ट्रातून एकूण १०२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यातील ५१ विद्यार्थी पुणे ग्रुप येथील असून, ५१ विद्यार्थी मुंबई बी ग्रुप येथील होते. या शिबिरासाठी एकूण पाच विविध राज्यांमधून विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये प्रामुख्याने गुजरात, दिल्ली, मध्यप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र आणि उत्तराखंड आदींचा समावेश होता. या कार्याबद्दल महाराष्ट्र संचालनालयास स्मृतिचिन्ह व लेफ्टनंट डॉ. बळे यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

दै. सकाळ दि. 07/12/2023 पान 06

## संशोधन प्रकल्प स्पर्धा : जुन्नरच्या छत्रपती महाविद्यालयाच्या तीनही प्रकल्पांची निवड

# 'आविष्कार २०२३' मध्ये विद्यार्थ्यांना यश

**जुन्नर, ता. ६ : येथील श्री शिवछत्रपती महाविद्यालयाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'आविष्कार २०२३' या विभागीय पातळीवरील संशोधन प्रकल्प स्पर्धेत तीन प्रकल्प सादर केले. या तीनही प्रकल्पांची स्पर्धेच्या पुढील फेरीसाठी निवड झाली असल्याचे प्राचार्य डॉ. एम. बी. वाघमारे यांनी सांगितले.**



बारामती : 'आविष्कार २०२३' स्पर्धेचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार स्वीकारताना श्री शिवछत्रपती महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी.

बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात ही स्पर्धा नुकतीच पार पडली. यामध्ये तीन वेगवेगळ्या श्रेणीत शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या पदव्युत्तर प्राणिशास्त्र विभाग व संशोधन केंद्राचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

या स्पर्धेतील पहिल्या वैद्यकीय व औषधनिर्माण श्रेणीमध्ये अमिना पठाण व मासूमा सय्यद यांनी सादर केलेल्या 'स्क्रीनिंग ऑफ अँटिमायक्रोबियल अँक्टिव्हिटी अँडफायटोकेमिकल स्टडीज ऑफ अ मशरूम गॅनोरिकस सिल्व्हॅटिकस' प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला. या प्रकल्पामध्ये प्रतिजैविक प्रतिरोधकतेच्या जागतिक समस्येवर एक आश्वासक उपाय म्हणून गॅनोरिकस सिल्व्हॅटिकस या मशरूमचा उपयोग केला जाऊ शकतो हे दाखविण्यात आले. त्यानंतर अभियांत्रिकी व तंत्रज्ञान श्रेणीमध्ये अल्फियाबानो शेख आणि जैनब फातिमा कागदी यांनी सादर केलेल्या 'रिमूव्हल ऑफ मिथील ग्रीन डाय बाय युजिंग नॉवेल बायोमटेरिअल' प्रकल्पाला द्वितीय क्रमांक मिळाला. यात टेक्सटाइल कारखान्यातील दूषित पाण्याच्या शुद्धीकरणासाठी आपण अर्चटिना फुलिका या गोगलगाईच्या शंखाचा वापर करू शकतो हे सिद्ध करण्यात आले. तसेच, कृषी व पशुपालन श्रेणीमध्ये सिद्धांत गायकवाड व सर्फराज पठाण यांनी सादर केलेल्या 'इफेक्ट्स ऑफ सिंथेटिक पेन किलर्स ऑन फ्रेशवॉटर फौना : अ केस स्टडी ऑन पोइसिलीया रेटीक्यूलॅटा' या संशोधन प्रकल्पाला देखील द्वितीय क्रमांक मिळाला. या प्रकल्पामध्ये आपण जे कृत्रिम वेदनाशामक औषधी घेतो त्याचा माशांच्या रक्तातील पेशींवर काय दुष्परिणाम होतो हे दाखविण्यात आले आहे.

या तीनही प्रकल्पांना महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभाग व संशोधन केंद्रप्रमुखांचे मार्गदर्शन लाभले. या यशासाठी संस्थेचे अँड. संजय काळे, अध्यक्ष प्रतिनिधी व्ही. बी. कुलकर्णी व सर्व शिक्षकांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

दै. सकाळ दि. ०७/१२/२०२३ पान ०६

## संशोधन प्रकल्प स्पर्धा : जुन्नरच्या छत्रपती महाविद्यालयाच्या तीनही प्रकल्पांची निवड

# 'आविष्कार २०२३' मध्ये विद्यार्थ्यांना यश

**जुन्नर, ता. ६ : येथील श्री शिवछत्रपती महाविद्यालयाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'आविष्कार २०२३' या विभागीय पातळीवरील संशोधन प्रकल्प स्पर्धेत तीन प्रकल्प सादर केले. या तीनही प्रकल्पांची स्पर्धेच्या पुढील फेरीसाठी निवड झाली असल्याचे प्राचार्य डॉ. एम. बी. वाघमारे यांनी सांगितले.**



बारामती : 'आविष्कार २०२३' स्पर्धेचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार स्वीकारताना श्री शिवछत्रपती महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी.

बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात ही स्पर्धा नुकतीच पार पडली. यामध्ये तीन वेगवेगळ्या श्रेणीत शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या पदव्युत्तर प्राणिशास्त्र विभाग व संशोधन केंद्राचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

या स्पर्धेतील पहिल्या वैद्यकीय व औषधनिर्माण श्रेणीमध्ये अमिना पठाण व मासूमा सय्यद यांनी सादर केलेल्या 'स्क्रीनिंग ऑफ अँटिमायक्रोबियल अँक्टिव्हिटी अँडफायटोकेमिकल स्टडीज ऑफ अ मशरूम ऍगारिकस सिल्व्हॅटिकस' प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला. या प्रकल्पामध्ये प्रतिजैविक प्रतिरोधकतेच्या जागतिक समस्येवर एक आश्वासक उपाय म्हणून ऍगारिकस सिल्व्हॅटिकस या मशरूमचा उपयोग केला जाऊ शकतो हे दाखविण्यात आले. त्यानंतर अभियांत्रिकी व तंत्रज्ञान श्रेणीमध्ये अल्फियाबानो शेख आणि जैनब फातिमा कागदी यांनी सादर केलेल्या 'रिमूव्हल ऑफ मिथील ग्रीन डाय बाय युजिंग नॉवेल बायोमटेरिअल' प्रकल्पाला द्वितीय क्रमांक मिळाला. यात टेक्सटाइल कारखान्यातील दूषित पाण्याच्या शुद्धीकरणासाठी आपण अचॅटिना फुलिका या गोगलगाइच्या शंखाचा वापर करू शकतो हे सिद्ध करण्यात आले. तसेच, कृषी व पशुपालन श्रेणीमध्ये सिद्धांत गायकवाड व सर्फराज पठाण यांनी सादर केलेल्या 'इफेक्ट्स ऑफ सिंथेटिक पेन किलर्स ऑन फ्रेशवॉटर फौना : अ केस स्टडी ऑन पोइसिलीया रेटीक्यूलॅटा' या संशोधन प्रकल्पाला देखील द्वितीय क्रमांक मिळाला. या प्रकल्पामध्ये आपण जे कृत्रिम वेदनाशामक औषधी घेतो त्याचा माशांच्या रक्तातील पेशींवर काय दुष्परिणाम होतो हे दाखविण्यात आले आहे.

या तीनही प्रकल्पांना महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभाग व संशोधन केंद्रप्रमुखांचे मार्गदर्शन लाभले. या यशासाठी संस्थेचे अँड. संजय काळे, अध्यक्ष प्रतिनिधी व्ही. बी. कुलकर्णी व सर्व शिक्षकांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Chaturchand Co




टी. सी. महाविद्यालयातील लेफ्टनंट डॉ. विवेक बळे यांना सन्मानित करण्यात आले.

# लेफ्टनंट डॉ. बळे यांचा गौरव

८/१२/२३ पान ६

बारामती : पुढारी वृत्तसेवा

